Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Oct. 2022 Issue - 60 Vol. 1

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139

# भारतीय लोकशाही आणी प्रशासकीय सुधारणा

प्रा . खंदारे के.जे.
लोकप्रशासन विभागप्रमुख्
शीवाजी महावीदयालय हींगोली

गोषवारा

देशाकरिता लोकशाही व्यवस्था स्वीकारण्याचा निर्णय झाल्यानंतर संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही या दोन पद्धती स्वीकारण्याचे पर्याय आपल्यासमोर होते. परंतु घटनाकार, घटना समिती व तत्कालीन नेतृत्वाने संसदीय लोकशाही व्यवस्था स्वीकारली. या व्यवस्थेत देशाचा कारभार हाकण्याची जबाबदारी राजकीय नेत्यांची असली तरी सनदी अधिकाऱ्यांनी म्हणजेच प्रशासनाने राज्यघटनेच्या तरतुदींचे पालन होईल, कायद्याची बूज राखली जाईल याची काळजी घेणे गरजेचे आहे. याच दृष्टीने प्रत्येक राज्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांकरिता बिझनेस रुल तयार केले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात बहुतांश राजकीय पुढारी व लोकप्रतिनिधी राज्य घटनेचे अभ्यासक होते. राज्य घटनेतील तरतुदी, कायद्याने त्यांना असलेले अधिकार यांचे त्यांना योग्य भान होते. त्याचबरोबर सनदी अधिकारी देखील सरकारला योग्य तो सल्ला देण्याचे धाडस दाखवत होते. अधिकाऱ्यांनी दिलेला सल्ला मानून लोकप्रतिनिधी आपल्या कार्यपद्धतीत बदल करीत होते. सध्या दुर्दैवाने लोकप्रतिनिधींना सनदी अधिकारी योग्य सल्ला देत नाहीत किंवा अधिकाऱ्यांनी दिलेला सल्ला लोकप्रतिनिधी मनावर घेत नसावेत. लोकप्रतिनिधी व सनदी अधिकारी यांच्यातील मिलीभगतची अनेक उदाहरणे आहेत.

संज्ञा : लोकशाही व्यवस्था, प्रशासन, प्रशासकीय सुधारणा

- प्रस्तावना

आधुनिक काळात भारतासह जगातील सर्वच राष्ट्रांना आपले प्रशासन कार्यक्षम व लोकाभिमुख बनविण्याची आवश्यकता जाणवू लागली आहे. प्रशासन हे राज्यातील जनतेच्या सोयीसाठी असते. जनतेला विविध प्रकारच्या सेवा पुरविणे, हा प्रशासनाचा प्रमुख उद्देश असतो; म्हणून प्रशासन आणि नागरिक यांच्यात निकटचे संबंध प्रस्थापित झाले पाहिजेत. तसेच प्रशासनाकडून राज्यातील नागरिकांच्या असलेल्या अपेक्षांची पूर्तता होण्यासाठी प्रशासनात कार्यक्षमता आणणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रशासन कार्यक्षम व लोकाभिमुख बनविण्याची गरज किंवा महत्त्व विचारात घेऊन विविध देशांनी त्यादृष्टीने निश्चित स्वरूपाचे पध्दतशीर व संघटित प्रयत्न सुरू केले आहेत; त्यामुळे प्रशासनात अनेक प्रकारच्या सुधारणा घडून येत आहेत. विशेषतः दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात प्रशासकीय सुधारणेच्या प्रयत्नांना विशेष चालना मिळाली. या काळात प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी निरनिराळ्या मार्गांचा शोध घेतला जाऊ लागला. आधुनिक काळात कोणत्याही देशातील लोकप्रशासनाला नागरी सेवांची उपयुक्तता वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत, याचा विचार करावा लागतो आणि त्यासाठी विविध मार्ग चोखाळावे लागतात. त्यातूनच प्रशासकीय सुधारणेच्या प्रश्नाला चालना मिळाली आहे.

- उदेश :

1. प्रशासनातील सुधारणाचा अभ्यास करणे.
2. प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रशासकीय संघटनेच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे

- प्रशासकीय सुधारणा

माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे प्रशासन सर्वदूर पोहोचले. मीडियाचा वचक वाढला. माहितीच्या अधिकारामुळे जनतेच्या हाती मोठे शस्त्र लाभले आहे. मात्र सनदी माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे प्रशासन सर्वदूर पोहोचले. मीडियाचा वचक वाढला. माहितीच्या अधिकारामुळे जनतेच्या हाती मोठे शस्त्र लाभले आहे. मात्र सनदी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमधील राजकीय हस्तक्षेप थांबवणेही गरजेचे होऊन बसले आहे.राज्यघटनेने जनतेला काही मूलभूत स्वातंत्र्य प्रदान करतानाच कर्तव्ये सोपवली आहेत. स्वत:च्या हक्कांकरिता लढताना जनता कर्तव्य विसरली आहे. ब्रिटीशांच्या पोलीस राजचा पगडा आपल्यावरून दूर झाला नाही. राज्यघटनेच्या प्रभावी अंमलबजावणीपेक्षा पोलीसी खाक्याचा वापर करून अनेक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आपल्याकडे झाल्याने सत्ताधारी व जनता यांच्यात दुरावा निर्माण होत गेला. देशात निवडणूक आयोगामार्फत होणाऱ्या निवडणुका हाच सध्या केवळ राजकीय मंडळींवरील एकमेव अंकुश राहिला आहे. राज्यघटनेत



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139


दुरुस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देण्याच्या निर्णयामुळे प्रशासनातील अधिकाऱ्यांचा जनतेशी थेट संबंध आला. जनतेच्या समस्यांच्या मुळापर्यंत पोहोचण्याची संधी अधिकाऱ्यांना लाभली. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे प्रशासन सर्वदूर पोहोचले. मीडियाचा वचक वाढला आहे. भ्रष्टाचार करणाऱ्या, गुन्हे करणाऱ्या अधिकाऱ्यांना वठणीवर आणण्याचे काम सध्या मीडिया करीत आहे. माहितीच्या अधिकारामुळे तर जनतेच्या हाती मोठे शस्त्र लाभले आहे. सरकारचा पैसा कसा खर्च होतो आहे यावर बारीक लक्ष ठेवणे शक्य झाले आहे. लपवाछपवीला आता वाव कमी आहे.

पोलीस रिफॉर्मच्या माध्यमातून पोलीस दलातील नियुक्त्यांमधील राजकीय हस्तक्षेप थांबण्यात येण्याचा आग्रह जेवढा योग्य आहे तेवढाच सनदी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमधील राजकीय हस्तक्षेप थांबवणेही गरजेचे आहे. सनदी अधिकाऱ्यांची सेवा ही केंदीय सेवा करण्यामागे उद्देश तोच होता की राजकीय हस्तक्षेप होऊ नये. परंतु सनदी अधिकारी सर्व पदे महत्त्वाची मानत नाहीत. साहजिकच नियुक्त्यांकरिता राजकीय आशीर्वाद मिळविण्याकरिता त्यांची धडपड सुरू असते. सनदी अधिकाऱ्यांच्या सेवा रचनेत सुधारणेचा विषय त्यांच्या संघटना उपस्थित करणार नाहीत कारण अशा संघटनांचा मुख्य सचिव हाच अध्यक्ष असतो. बरेचदा सेवाज्येष्ठता डावलून मुख्य सचिवपदी नियुक्ती केली जाते. त्यामुळे सनदी अधिकायांच्या नियुक्त्यांमधील राजकीय हस्तक्षेपाची चर्चा कोण करणार हा प्रश्न आहे. एक गोष्ट निश्चित नमूद करायला हवी की, ब्रिटनइतकी आपली लोकशाही प्रगल्भ झाली नसली तरी शेजारील पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश या देशांपेक्षा भारतातील परिस्थिती खूप चांगली आहे.

- **प्रशासकीय सुधारणेसाठी उपाययोजना :**

प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रशासकीय संघटनेच्या कार्यपध्दतीचे पूनर्परीक्षण करणे आवश्यक असते. संघटनेच्या कार्यपध्दतीत कोणते दोष किंवा उणिवा आहेत. याचा प्रथम शोध घ्यावा लागतो, त्यानंतर ते दोष व उणिवा दूर करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. प्रशासकीय सुधारणेसाठी सामान्यतः पुढील तीन प्रकारच्या उपाययोजना कराव्या लागतात.

१. रचनात्मक सुधारणा प्रत्येक संघटनेची एक विशिष्ट रचना असते. काही वेळा संघटनेच्या रचनेतच काही दोष राहून गेलेले असतात, किंवा पुढील काळात तिच्यात काही दोषांचा शिरकाव झालेला असतो. प्रशासकीय सुधारणेसाठी संघटनेच्या रचनेतील हे दोष दूर करणे आणि तिची रचना अधिक परिपूर्ण बनविण्यावर भर देणे आवश्यक ठरते.

२. कार्यपध्दतीत सुधारणा प्रशासकीय सुधारणेसाठी संघटनेच्या रचनात्मक सुधारणेप्रमाणे कार्यपध्दतीच्या सुधारणेकडेही लक्ष देणे आवश्यक असते. प्रत्येक संघटना आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विशिष्ट कार्यपध्दतीचा अवलंब करते. तथापि, तिची कार्यपध्दती पूर्णपणे निर्दोष असू शकत नाही. संघटनेच्या कार्यपध्दतीत अनेक दोष निर्माण होत असतात त्यामुळे तिची कार्यपध्दती सुधारण्यास मोठ्या प्रमाणावर वाव असतो.

३. सेवकांच्या मनोवृत्तीत परिवर्तन प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी संघटनेच्या रचनेत व कार्यपध्दतीत महत्वपूर्ण बदल करणे आवश्यक असले तरी ते पुरेसे नसतात. प्रशासकीय सुधारणेचा संबंध संघटनेत कार्यरत असलेल्या मानवी घटकांशीही असतो म्हणून प्रशासकीय सुधारणेसाठी संघटनेतील मानवी घटकांनीही दखल घेणे आवश्यक ठरते. त्याकरिता संघटनेत कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या किंवा सेवकांच्या मनात समाधानाची भावना निर्माण होवून ते आपल्या कामात मनापासून रस घेवू लागतील, अशी परिस्थिती कामाच्या ठिकाणी निर्माण करणे गरजेचे असते. थोडक्यात, प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि ते लोकाभिमुख बनविण्यासाठी प्रशासनातील मानवी पटकाकडेही पुरेसे लक्ष द्यावे लागते.

- **सारांश**

शासन संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा, सेवक वर्ग व वित्ताची आवश्यकता असते. सेवक प्रशासनाचा विचार करताना त्यांची भरती प्रक्रिया, प्रशिक्षण, बढती व तिची तत्वे, सेवाशाश्वती, शिस्त, नैतिकता, सेवानिवृत्ती, निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी या घटकांचा सखोल अभ्यास करणे महत्त्वाचे बनते. तसेच शासन यंत्रणा चालविताना या सेवक प्रशासनाबरोबर वित्तीय प्रशासनाची नितांत आवश्यकता प्रतिपादित केली जाते. त्यात राष्ट्राचे अंदाजपत्रक कसे असावे? त्यांची निर्मिती, मंजूरी व अंमलबजावणीची प्रक्रिया कशी असते याचा उहापोह गरजेचा ठरतो. तसेच आधुनिक काळात या दोन गोष्टींबरोबर लोक प्रशासनात जी नवी परिमाणे आलेत त्यांचा अभ्यासही महत्वाचा ठरतो. त्यात प्रामुख्याने प्रशासकीय सुधारणा व कायद्यांचा समावेश होतो. या सर्व घटकांच्या अभ्यासामुळे लोक प्रशासनात भर टाकली जात आहे हे लक्षात घ्यावे लागेल.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 60 , Vol. 1 Oct. 2022 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

**संदर्भ ग्रंथ**

1. प्रा. के. आर. बंग: "लोकप्रशासन तत्त्वे आणि सिध्दांत", विद्या औरंगाबाद, २०१३. बुक पब्लिशर्स,
2. डॉ. पारस बोरा व डॉ. शाम शिरसाठ : "लोकप्रशासनशास्त्र". ज्ञान समिधा प्रकाशन. औरंगाबाद, २००५.
3. प्रा. व्ही. बी. पाटील : "समग्र लोकप्रशासन", के. सागर, २०११.
4. प्रा. के. आर. बंग: "भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण".
5. पाटील बी.बी. : "वित्तीय प्रशासन", विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११
6. प्रा. भोगले शांताराम कृष्णराव : "लोकप्रशासन : सिध्दांत व कार्यपध्दती", प्रकाशक- . श्री मोहिनीराज पब्लिकेशन, औरंगाबाद, १९७४.
7. प्रा. इनामदार ना. र. : "लोकप्रशासन", महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, साधना प्रकाशन, पुणे, १९७५..
8. प्रा. बंग के. आर. : "लोकप्रशासन तत्त्वे आणि सिध्दांत", विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१३.
9. प्रा. देशपांडे श्रीकांत: "लोकप्रशासन सिद्धांत आणि व्यवहार", प्रकाशक- मंगेश प्रकाशन, नागपूर.